# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३/१०/२०२०**

## जिल्हा : पुणे

### मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान २८.० ते ३३.८ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २०.६ ते २२.० अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ९२ ते ९८ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ३७ ते ८७ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०.९ ते १.८ कि.मी. होता. मागील आठवड्यात ४२.४ मिमी एवढा पाऊस झाला.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्हयात कमाल तापमान २९ ते ३२ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १९ ते २२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ९२ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ७० टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०४ ते १२ कि.मी. दरम्यान राहील. आकाश पूर्णत: ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा नैॠत्येकडून ईशान्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (०७/१०/२०२० ते १३/१०/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१३/१०/२०२० ते १७/१०/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | दिनांक | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.2 | 23.6 | 2.4 | 16.2 | पाऊस (मिमी) | 30 | 28 | 17 | 17 | 10 |
| 33.4 | 33.0 | 33.1 | 32.8 | 33.8 | 28.0 | 31.3 | कमाल तापमान )अं.से(. | 29 | 29 | 30 | 31 | 32 |
| 20.8 | 21.6 | 21.0 | 22.0 | 22.0 | 20.6 | 21.3 | किमान तापमान अं).से(. | 22 | 21 | 22 | 19 | 19 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 8 | 8 | 7 | 7 | 8 |
| 93 | 93 | 92 | 92 | 98 | 95 | 95 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 87 | 94 | 93 | 93 | 92 |
| 37 | 40 | 53 | 50 | 87 | 58 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 56 | 81 | 74 | 68 | 70 |
| 1.8 | 1.6 | 1.0 | 1.8 | 1.6 | 1.2 | 0.9 | वाऱ्याचा वेग (तास/किमी) | 9 | 12 | 4 | 7 | 8 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा )अंश( | 268 | 230 | 208 | 200 | 188 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार पुणे जिल्हयात दिनांक १३ व १४ ऑक्टोबर २०२० रोजी बऱ्याच ठिकाणी तर दिनांक १५, १६ व १७ ऑक्टोबर २०२० रोजी काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.<br>**ईशारा :** पुणे जिल्हयात दि. १३ व १६ ऑक्टोबर २०२० रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता असून दि. १५ ऑक्टोबर २०२० रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह जोरदार ते अति जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पडण्याऱ्या पावसाचे पाणी शेतात, उभ्या पिकात साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराच्या बाजूने चर काढावी.<br>• पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची तसेच आपल्या जनावरांची काळजी घ्यावी व जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत.<br>• पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी .<br>• खरीप पिकांची काढणी, मळणी पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून करावी व सदर |

| | | |
|---|---|---|
| | | पिकांचे पावसाने नुकसान होऊ नये याकरिता काढलेल्या पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवण करावी.<br>• जिल्ह्यातील रब्बी ज्वारी व जिरायत हरभरा पिकांची पेरणी करणेसाठी जमिनीची पुर्वमशागत करुन जमिन तयार करावी. रब्बी ज्वारी व इतर पिकांची जमिनीच्या पुरेश्या ओलाव्यावर व योग्य खोलीवर बीजप्रक्रिया करून पेरणी करावी. |
| भात | दाणे भरणे | दाणे भरणे अवस्थेत १० सेमी पाण्याची पातळी ठेवावी. ढगाळ व दमट हवामानामुळे भात पिकावर पाने गुंडाळणाऱ्या अळीने आर्थिक नुकसानाची पटली (२ प्रदुर्भावीत पाने प्रती चूड) ओलांडल्यानंतर शिफारशीत फवारणी लगेच करावी. पाने गुंडाळणारी अळी, खोड कीड आणि तुडतुडे याच्या नियंत्रणाकरिता ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा असिफेट ७५ टक्के एस पी, ६०० ग्रम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| सोयाबीन | पक्वता ते काढणी | सोयाबीनच्या उभ्या पिकातील शेंगा मधील बियाण्याची उगवण समस्येच्या नियंत्रणासाठी शेतामध्ये चर काढून पाण्याचा चांगला निचरा करावा व शेतामध्ये हवा खेळती ठेवावी. पाऊस थांबताच पक्व पिकाची काढणी करून काडाचे छोटे छोटे ढीग करून प्रखर सूर्य प्रकाशात वाळवावे. त्यानंतर प्रादुर्भाव / उगवण झालेल्या शेंगा बाजूला काढून मळणी करावी. |
| मका | पक्वता ते काढणी | मका पिकावर अमेरिकन लष्करी आळीचा १० % पेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. ४ मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी १५ ते २० दिवसापर्यंत करु नये. |
| तुर | फुलोरा | तूर पिकावरील पाने गुंडाळणारी अळीच्या नियंत्रणासाठी ५ % निबोंळी अर्काची फवारणी करावी. तूर पिकामध्ये मर रोगाचे नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा १० ग्राम प्रती १ लिटर पाण्यात मिसळून ५०-१०० मिली प्रती झाड आळवणी (ड्रेंचिंग) करावे. |
| वांगी | | वांग्यामध्ये शेंडा आणि फळे पोखरण्या-या अळीच्या नियंत्रणासाठी ४ % निंबोळी अर्क किंवा सायपरमेथ्रीन २५% ४ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात पावसाची उघडीप पाहून करावी. दर आठवड्याला किडलेले शेंडे आणि फळे गोळा करुन नष्ट करावीत. |
| कांदा | | सध्याच्या ढगाळ व दमट हवामानामुळे कांदा पिकावरील फुलकिडे या किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोयएट ३० % ईसी १५ मिली किंवा ल्याम्डा सायहयालोथ्रीन ५ % ई सी ६ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पावसाची उघडीप पाहून करावी. |
| आंबा | | सध्याच्या ढगाळ व दमट हवामानामुळे आंबा पिकावर नविन फुटीवरील किड व रोगांच्या नियंत्रणासाठी लॅमडा सायहेलोथ्रीन ५ % ई सी ६ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ मि ली अधिक २० ग्राम कॅर्बेन्डाझीम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | सर्व जनावरांना चपटे कृमी (लिव्हर फ्ल्यूक) रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने लसीकरण करून घ्यावे. पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वछ पाणी द्यावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा , कृ.म.वि., पुणे

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : १३.१०.२०२०

**स्वाक्षरीत**

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा
प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे